सुधारणा व पुनर्वसन

कारागृह व सुधारसेवा विभाग , महाराष्ट्र शासन

फोन क्र. : (०२०) २६१२३५६३ फॅक्स क्र. : (०२०) २६१२५८७८

Email ID : igoffice.est1-mh@gov.in Website : https://mahaprisons.gov.in/

जाहिरात क्र् आस्था/विविक्षित काम/सेनि अधि/करारनियुक्ती/ 9781 /२०२६/कक्ष-१ पुणे-१ दिनांक १.१०.२०२६

जाहिरात

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाचे आस्थापनेवर न्यायविभागाशी संबंधित विविक्षिक कामकाजासाठी सेवानिवृत्त अधिकारी (राजपत्रित व अराजपत्रीत गट ब) यांची शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र सीबीई १५२५/प्र क्र ३७/आस्थामं (का १३), दिनांक १०.६.२०२५ मधील अटी शर्ती नुसार करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. त्याकरिता खालील अटी व पात्रता पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांकडून ठरावीक कालावधीकरिता करार पध्दतीने नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

अक्र	कामकाजाचे स्वरुप	करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकारी यांची नियुक्ती करावयाची संख्या	मासिक पारिश्रमिक व भत्ते
१	१) बंद्यांची न्यायालयीन प्रकरणे. २) बंद्यांचे १४ वर्षीय अहवाल ३) बंद्यांचे संचित/अभिवचन रजा अपील प्रकरणे ४) मृत बंद्यांचे चौकशी अहवाल	०२	सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करून करार पध्दतीने नेमणुक करताना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मुळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम हे मासिक पारिश्रमिक असेल.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

<u>सूचना</u> : याबाबतचे अर्ज महासंचालक, कारागृहे व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, सेंन्ट्रल बिल्डींग, दुसरा मजला, पुणे- ४११ ००१ येथील नोंदणी शाखा यांचेकडे **दिनांक १५.१०.२०२६ पर्यत कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.४५ वा.) पर्यत सादर करावेत.**

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात "**कारागृह विभागातील विविक्षीत कामकाजासाठी निवड अर्ज**" असे नमूद करुन दिनांक १५.१०.२०२६ पर्यत अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, सेंन्ट्रल बिल्डींग, दुसरा मजला, पुणे- ४११ ००१ या पत्त्यावर पोहचतील अशा बेताने पाठवावेत. दिनांक १५.१०.२०२६ रोजी सायं. ०५.४५ वा नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जदाराने अर्जामध्ये त्यांचा दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा. पत्रव्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता लिहिलेले दोन लिफाफे अर्जासोबत जोडावेत. अर्जाचा नमुना https://mahaprisons.gov.in/ या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

<u>अटी व शर्ती</u> :

१) **वयोमर्यादा :-** करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या सेवानिवृत्त व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील.

२) **नियुक्तीची कालमर्यादा-** उक्त कामकाजासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एक वर्षासाठी असेल. मात्र नेमुण दिलेल्या विविक्षित कामकाजाची पूर्तता होताच किंवा विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार सक्षम नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

३) **अर्हता व अनुभव** :- कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण आवश्यक. कार्यकारी संवर्गातून सेवानिवृत्त झालेला आणि कारागृह विभागात न्यायविभागाशी संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव आवश्यक.

४) **विशेष पात्रता :-** करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारिरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

५) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागिय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

इतर अटी व शर्ती :

१) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

२) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेली नसावी.

३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मुल्यमापन करतील.

५) सेवानिवृत्त पात्र अधिकाऱ्यांची निवड मुलाखतीव्दारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक अर्ज प्राप्तीनंतर कळविण्यात येईल.

६) मुलाखतीला येण्या-जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

७) करार पध्दतीने नियुक्ती देताना निवड करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडून शासन निर्णयान्वये विहित अटी शर्तीं , विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे बंधपत्र/हमीपत्र घेण्यात येईल.

(सुहास वारके)
महासंचालक
कारागृहे व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

Scanned with OKEN Scanner